पुढारी

# क्लिक हिलतर्फे कोरोना योद्ध्यांना रोगप्रतिकारशक्ती वर्धक औषधाचे वाटप

**सातारा : पुढारी वृत्तसेवा**

क्लिक हीलने सामाजिकतेचे भान जपत कोरोनाशी सामना करण्यासाठी श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्राच्या माध्यमातून १ लाख कोरोना योद्ध्यांना रस माधव वटी या रोगप्रतिकारशक्ती वर्धक औषधाचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती क्लिक हीलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास काटकर यांनी दिली.

सध्या कोरोनाने सर्वत्र हाहाकार घातला असून या कोरोना विरोधात डॉक्टर्स, नर्सेस, पोलिस, स्वच्छता कामगार व अन्य घटक लढा देत आहेत. या कोरोना योद्ध्यांना कोरोना संक्रमण होवू नये म्हणून क्लिक हील, श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुमारे १ लाख कोरोना योद्ध्यांना रस माधव वटी या रोगप्रतिकारशक्तीवर्धक औषधाचे वाटप करण्यात येत आहे.

दरम्यान, कोरोनाशी लढा देण्यासाठी सेवा कर्मचाऱ्यांनी आपले प्राण पणाला लावले आहेत. हे कर्मचारी वारंवार बाधित व्यक्तींच्या संपर्कात येतात. त्यामुळे त्यांना संक्रमणाचा धोकाही सर्वाधिक असतो. त्यांना रस माधव वटी या रोगप्रतिकारशक्तीवर्धक औषधाद्वारे एक सुरक्षाकवच देवू शकतो, असा विश्वास श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्राचे अध्यक्ष आनंदनाथ सांगवडेकर यांनी व्यक्त केला.